# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः08.11.2024** **वारःशुक्रवार**

---

1. विधानसभा निवडणुकीसाठी सर्वच पक्षाच्या नेत्यांच्या राज्यभरात प्रचारसभा; पंतप्रधान नरेंद्र मोदी आज राज्याच्या दौऱ्यावर
2. विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा वचननामा जाहीर
3. उत्सव निवडणुकीचा, अभिमान महाराष्ट्राचा; या मतदान जनजागृतीचा आज होणार प्रारंभ आणि
4. सरकार लवकरच दहशतवादविरोधी राष्ट्रीय धोरण जाहीर करणार असल्याची केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची माहिती

**<u>मोदीसभा-नाशिक, मुंबई</u>**

विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात विविध पक्षांचे नेते जोरदार प्रचार करताना दिसत आहेत. भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी आजपासून राज्यात विविध ठिकाणी प्रचारसभा घेणार आहेत. येत्या 14 नोव्हेंबर पर्यंत धुळे, नाशिक, अकोला, नांदेड, चंद्रपूर, चिमूर, सोलापूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, नवी मुंबई आणि मुंबई इथं पंतप्रधानांच्या प्रचार सभा होणार आहेत. मोदी यांची पहिली सभा आज धुळे इथं दुपारी 12 वाजता होईल; त्यानंतर नाशिकमध्ये दुपारी दोन वाजता सभा होईल, अशी माहिती भाजपा नेते आणि राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी काल नाशिकमध्ये दिली. या सभेच्या निमित्ताने कडेकोट सुरक्षा वाढवण्यात आली असून तपोवनासह सुमारे 11 मार्गांवरील वाहतुकीवर निर्बंध घालण्यात आले आहेत. तसंच संपूर्ण जिल्ह्यात ड्रोन उडवण्यास मनाई करण्यात आली आहे. भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री अमित शहा हे देखील आज राज्याच्या दौऱ्यावर असून त्यांच्या सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यात विविध ठिकाणी सभा होणार आहेत.

**<u>कॉंग्रेस प्रचार सभा</u>**

विधानसभा निवणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांच्या प्रचारसभांचंही आयोजन करण्यात आलं आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, यांच्यासह काँग्रेसचे वरिष्ठ नेते राज्याच्या विविध भागांत काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी जाहीर सभा घेणार असल्याची माहिती कॉंग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत दिली. 10 नोव्हेंबर रोजी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविकास आघाडीचा जाहिरनामा प्रसिद्ध केला जाणार असल्याचंही ते म्हणाले.

**<u>शरद पवार सभा</u>**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार सध्या विदर्भाच्या दौऱ्यावर असून, त्यांनी काल पूर्व नागपूर आणि गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा विधानसभा मतदारसंघातील महविकास आघाडी उमेदवारांच्या प्रचारार्थ सभा घेतल्या. महाराष्ट्रातून उद्योगाचे पलायन झाले असून पंतप्रधान हे एका राज्याचे नसून ते संपूर्ण देशाचे आहे हे लक्षात घ्यायला हवं असं पवार म्हणाले. यावेळी त्यांनी महायुती सरकारवर टीका केली.

**<u>वचननामा–मुंबई</u>**

विधानसभा निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं काल मुंबईत आपला वचननामा प्रसिद्ध केला. पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वांद्रे इथल्या निवासस्थानी या वचननाम्याचं प्रकाशन झालं. महिला, आरोग्य, शिक्षण, उद्योग

तसंच मुंबईच्या विकासासाठी असलेलं धोरण या प्रमुख घटकावर आधारीत हा वचननामा आहे. 'हा आपल्या पक्षाचा वचननामा असून महाविकास आघाडीचा सविस्तर जाहीरनामा येत्या काही दिवसात जाहीर होईल', असं उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.

**<u>एकनाथ शिंदे-अकोला</u>**

शिवसेनेचे अध्यक्ष आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल अकोला जिल्ह्यात बाळापूर तालुक्यात वाडेगाव इथं महायुतीच्या उमेदवारांसाठी प्रचार सभा घेतली. केंद्र आणि राज्य सरकारचं डबल इंजिन महाराष्ट्राचा विकास करत आहे, असं सांगून विरोधकांवर त्यांनी टीका केली.

**<u>फडणवीस–यवतमाळ</u>**

भाजपाचे वरिष्ठ नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल यवतमाळ जिल्ह्यात फुलसावंगी इथं जाहीर सभा घेतली. यवतमाळमध्ये रस्ते, रेल्वेचे जाळे उभारणार तसंच शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार, असं आश्वासन फडणवीस यांनी दिलं. वैनगंगा-नळगंगा प्रकल्पाच्या माध्यमातून विदर्भात 10 लाख एकर शेतजमिनीला कायमस्वरूपी ओलिताखाली आणण्याचं काम आपल्या सरकारनं सुरु केल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

**<u>शिंदे-अहिल्यानगर</u>**

केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी काल अहिल्यानगर जिल्ह्यातल्या कर्जत जामखेड विधानसभा मतदारसंघांमध्ये राशीन इथं जाहीर सभा घेतली. यावेळी महायुतीचे उमेदवार राम शिंदे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

**<u>संमेलन-सोलापूर</u>**

राष्ट्रनिर्माणात राजस्थानी आणि मारवाडी समाजाचा वाटा मोठा आहे. विधानसभा निवडणुकीत सोलापूर शहरातील तीनही मतदारसंघात राजस्थानी, मारवाडी समाज भाजपा आणि महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे, असा विश्वास राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी व्यक्त केला. राजस्थानी आणि मारवाडी समाज संस्थांतर्फे भारतीय जनता पार्टी महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ काल सोलापूरमध्ये मारवाडी समाज संमेलन झालं. त्यावेळी ते बोलत होते.

**<u>मतदान जागृती</u>**

विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर स्वीप अंतर्गत, मतदान जनजागृतीसाठी 'उत्सव निवडणुकीचा, अभिमान महाराष्ट्राचा' हे विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाचा राज्यस्तरीय प्रारंभ मुंबईत गेटवे ऑफ इंडिया इथून संध्याकाळी 5 वाजता होणार आहे. निवडणूक आयोग तसंच राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाचे वरीष्ठ अधिकारी, चित्रपट, क्रीडा आणि सामाजिक क्षेत्रातल्या मान्यवरांच्या उपस्थितीत हा मतदार जागृती उपक्रमांचा प्रारंभ होणार आहे. केंद्रीय संचार ब्यूरो, मुंबई महापालिका आणि केंद्रीय निवडणूक आयोगाच्या वतीनं एक फिरतं प्रदर्शन आयोजित केलं असून प्रदर्शन लावलेल्या या गाड्या 15 निवडक जिल्ह्यांमध्ये मतदानविषयक जनजागृतीचा संदेश घेऊन जाणार आहेत.

**<u>निवडणूक आयोग-पुणे</u>**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी विशेष प्रयत्न करावेत; या दृष्टीने स्वीप अंतर्गत मतदान जागृती उपक्रमांवर भर द्यावा, असे निर्देश केंद्रीय निवडणूक आयोगाचे उप निवडणूक उपायुक्त हिरदेश कुमार यांनी काल निवडणूक यंत्रणांना दिले. मतदारांना मतदान केंद्रावर आवश्यक सुविधा पुरवण्यासाठी योग्य व्यवस्थापन करावं, अशाही सूचनाही त्यांनी दिल्या. पुणे विभागांतर्गत सर्व जिल्ह्यांतील विधानसभा मतदारसंघांमधील निवडणूक पूर्वतयारीबाबत झालेल्या आढावा बैठकीत ते पुण्यात बोलत होते. शहरी भागात मतदानाच्या टक्केवारीत वाढ होण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न करावेत, मतदार चिठ्ठ्यांचे 100 टक्के आणि वेळेत वाटप करावे, असं ते म्हणाले. पुणे जिल्ह्यात राबवलेला 'नो युवर पोलींग स्टेशन उपक्रम इतर जिल्ह्यातही राबववा, अशी सूचना त्यांनी केली.

राज्यात येत्या 20 तारखेला होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत मतदान करण्याचं आवाहन अभिनेता सुनील बर्वे यांनी केलं आहे.....

**शहा**

सरकारी यंत्रणांना आणखी बळ देण्यासाठी सरकार वचनबद्ध असून सरकार लवकरच दहशतवादविरोधी राष्ट्रीय धोरण जाहीर करणार असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल सांगितलं. नवी दिल्ली इथं दहशतवाद विरोधी परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. राष्ट्रीय तपास संस्थेनं आयोजित केलेल्या या दोन दिवसीय परिषदेला केंद्रीय तपास संस्थांचे अधिकारी, न्यायवैद्यक आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञ, राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित आहेत. तीन नव्या फौजदारी कायद्यांमुळं नागरिकांच्या अधिकारांचं रक्षण होत असल्याचं अमित शहा म्हणाले. कर्तव्य निभावत असताना हुतात्मा झालेल्या 36 हजारांहून अधिक पोलिसांना शहा यांनी आदरांजली अर्पण केली.

**हवामान**

येत्या 24 तासात राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.